# प्रस्तावना

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण – २००८/प्र.क्र.२/नियोजन-२, मंत्रालय मुंबई – ३२ , दिनांक २४ एप्रिल २०१२ अन्वये सन २००१-२०२१ रस्ते विकास योजना या योजनेस शासनाने अंतिम मान्यता प्रदान केली असून या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात दिनांक १ मे २०१२ पासून सुरु आहे.

१. सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम महाराष्ट विभागात मोडतो. सोलापूर जिल्हयाचे एकुण क्षेत्रफळ १४८८४.६० चौ. किलोमीटर असून ते उत्तर अक्षांश १७ ते १९ व पूर्व रेखांश ७५.० ते ७६.१५ हया मध्ये आहे.सोलापूर जिल्हयाचा सांगोला तालुक्यातील दक्षिणेक डील डोंगराळ भाग वगळता संपूर्ण प्रदेश सपाटीचा आहे. जिल्हयातील भिमा आणि सीना नदीच्या खो-यातील जमीनीचा मोहोळ, माळशिरस,पंढरपूर,मंगळवेढा,दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यातील दक्षिणेकडील जमीनीचा पट्टा हा काळया मातीचा आहे. जिल्हयाचे वार्षिक सरासरी पावसाचे प्रमाण हे ३७ सें.मी. इतके आहे. जिल्हयाचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे आहे.

२. सोलापूर जिल्हयामध्ये आदिवासी क्षेत्र नाही. सोलापूर जिल्हा हा प्रशासकीय दृष्टया विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यक्षेत्राखाली येतो. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दृष्टीने विचार करता सोलापूर जिल्हा हा मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांचे कार्यक्षेत्राखाली येतो.जिल्हयात एकुण ११ तालुके असून निरनिराळ्या लोकसंख्या गटातील ११३३ खेडी आहेत व १० शहरे असून त्यापैकी नगरपरिषदांची संख्या ९ असून एक महानगरपालिका आहे. जिल्हयात एकूण १०२८ ग्रामपंचायती आहेत. २००१ च्या जनगणनेनूसार जिल्हयाची लोकसंख्या ३८.५० लक्ष इतकी आहे.

३. जिल्हयातील पिकाखालील क्षेत्र हे जिल्हयाच्या एकुण क्षेत्रापैकी ७८०० हेक्टर इतकी आहे. एकुण जिल्हा हा पिकाच्या दृष्टीने अर्धविकसीत आहे . जिल्हयात औद्योगिकदृष्टया विकसित अशी सोलापूर, बार्शी , पंढरपूर, मोहोळ व अकलूज ही एकूण ५ केंद्रे आहेत .

जिल्हयात पर्यटकांच्या दृष्टीने आकर्षण ठरेल अशी अनेक ठिकाणे आहेत . उदा. सोलापूर, पंढरपूर, अक्कलकोट, उजनी धरण इत्यादी .

४. जिल्हयात अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचे जाळे खालीलप्रमाणे आहे .

| अ.क्रं | रस्त्याचा प्रकार / वर्गवारी | रस्त्यांची लांबी (३१/३/२००४ अखेर) |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय महामार्ग | १७७.०० |
| २ | प्रमुख राज्यमार्ग | १६५.०० |
| ३ | राज्यमार्ग | १२९६.०० |
| ४ | प्रमुख जिल्हामार्ग | ३०१३.०० |
| ५ | इतर जिल्हामार्ग | २०७०.०० |
| ६ | ग्रामीण मार्ग | ६०४३.०० |

जिल्हयातून राष्ट्रीय महामार्ग क्रं ९ , १३ व २११ जातात .

सोलापूर जिल्हयातून मुंबई ते चन्नई व कुर्डूवाडी ते पंढरपूर ही मध्यरेल्वेची ब्रॉडगेज लाईन आहे , तसेच कुर्डूवाडी ते लातूर व पंढरपूर ते मिरज ही नॅरोगेज रेल्वेलाईन जाते यामुळे कुर्डूवाडी, माढा, मोहोळ, सोलापूर, अक्कलकोट, पंढरपूर, सांगोला व इतर लहान गावे जोडली गेली आहेत. जिल्हयातील रेल्वेमार्गाची एकूण लांबी ४४८ कि.मी. आहे . जिल्हयात भीमा व सीना हया मोठया नद्या असून, माण भोगावती, बोरी इ. लहान नद्या आहेत . भीमा नदीवर भीमानगर येथे मोठे धरण बांधले आहे. धारणातील पाणी सिंचनासाठी व जलविद्यूत निर्मितीसाठी प्रामुख्याने केला जातो . जिल्हयातील नद्यामुळे व लहान मोठया धरणामुळे सोलापूर जिल्हयातील बराचसा भाग ऊस पिकाखालील क्षेत्र वाढत असून जिल्हयात एकूण १६ साखर कारखाने आहेत .

**२००१-२०२१ योजनेची ठळक वैशिष्ठये .**

१. केंद्रशासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या रस्ते **“ विकास योजना दृष्टीक्षेप २०२१ ”** पुस्तिकेत समाविष्ठ असलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे सोलापूर जिल्हयाची रस्ते विकास योजना तयार करण्यांत आली आहे .

१) ५००० लोकसंख्येवरील गावे राज्यमार्गावर आणणे .

२) १५०० व त्यावरील गावे व बाजार मुख्यालये प्रमुख जिल्हामार्गावर आणणे .

३) १००० ते १५०० लोकसंख्येची गावे इतर जिल्हामार्गावर आणणे .

४) सर्व मोठया शहरांना व तालुका मुख्यालय शहरास वळण रस्ते प्रस्तावित करणे .

५) औद्योगिक क्षेत्रांना, राज्यमार्ग/प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचे जोडरस्ते प्रस्तावित करणे .

६) तिर्थक्षेत्रे जोडणे .

७) पालखी मार्ग राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचे करणे इत्यादी .

सन १९८१-२००१ च्या सुधारित रस्ते विकास योजनेची व २००१-२०२१ मध्ये रस्ते विकास योजनेची अपेक्षिलेल्या लक्ष्यांची तुलनात्मक आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्रं | रस्त्याचा वर्ग | १९८१-२००१ रवियो नुसार जिल्हयामधील लांबी | मध्यावधी पुर्नविलोकनात मंजूर लांबी | २००१-२१ योजनेत प्रस्तावित लांबी | वाढ / घट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय महामार्ग | १५७.०० | १६०.२८० | १७६.६८० | १६.४०० (वाढ) | |
| २ | प्रमुख राज्यमार्ग | १९३.७६० | २६८.९३० | ३७२.२९२ | १०३.३६२ (वाढ) | |
| ३ | राज्यमार्ग | १३३२.४६० | १४२८.८३२ | १४३६.१९५ | ७.३६३(वाढ) | |
| ४ | प्रमुख जिल्हामार्ग | २५२८.५३० | २९२४.१८० | ४१७४.४७० | १२५०.२९०(वाढ) | |
| ५ | इतर जिल्हामार्ग | २१३०.२९० | २०६४.४४० | १३६७.७५० | ६९६.६९० (घट) | |
| ६ | ग्रामीण मार्ग | ४१०६.५०० | ६५५३.७७० | ९६०२.८७५ | ३०४९.१०५(वाढ) | |
| | **एकूण** | **१०४४८.५४०** | **१३४००.४३२** | **१७१३०.२६२** | **३७२९.८३०(वाढ)** | |

सोलापूर जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ १४८८४.६० चौ.किमी असून रस्ते घनता ११५.०७ कि.मी प्रति १०० चौ.कि.मी. एवढी येते .

१) वरील तक्ता दिनांक ३१/३/२००४ रोजी रस्त्याच्या स्वरुपात झालेले भौतिक साध्य दर्शविते . निरनिराळया वर्गाचे अस्तित्व असलेले रस्ते हे त्या रस्त्याच्या दर्जाप्रमाणे व तपशिलाप्रमाणे नाहीत . त्यामध्ये रस्त्याचे कमी रुंदीचे वाहतुकीचे पट्‌टे, रस्त्याच्या क्रस्ट मध्ये कमतरता, मो-यांची व पूलांची करतरता, रस्त्याच्या

धावपट्टीची सुधारणा इ. प्रकारच्या कमतरता असल्याने अस्तित्वात असलेली लांबी अपेक्षित दर्जाप्रमाणे करण्यासाठी व जिल्हयातील रस्त्यांचे जाळे सुधारणेसाठी मोठया प्रमाणात रस्ते विकासाची कामे हाती घेवून पूर्ण करण्याचे आवश्यकता आहे .

२) २००१-२०२१ रस्ते विकास योजनेप्रमाणे सुचित केलेले रस्त्याचे जाळे दर्शविणारी पुस्तिका व खालील नकाशे पुस्तिकेत अंतर्भूत केलेले आहेत .

१) सोलापूर जिल्हा नकाशा.
२) करमाळा तालुका नकाशा.
३) माढा तालुका नकाशा.
४) बार्शी तालुका नकाशा.
५) मोहोळ तालुका नकाशा.
६) उत्तर सोलापूर तालुका नकाशा.
७) दक्षिण सोलापूर तालुका नकाशा.
८) अक्कलकोट तालुका नकाशा.
९) मंगळवेढा तालुका नकाशा.
१०) सांगोला तालुका नकाशा.
११) पंढरपूर तालुका नकाशा.
१२) माळशिरस तालुका नकाशा.

**अधीक्षक अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ,सोलापूर**